6.3.1

राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक/ माध्यमिक/ उच्च माध्यमिक शाळातील शिक्षिका व महिला शिक्षिकेतर कर्मचारी यांना प्रसुती रजा मर्यादा १८० दिवसापर्यंत वाढविण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

शासन निर्णय क्रमांक: एसएसएन-१००९/(३८६/०९)/माशि-२,

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२

दिनांक : ८ मार्च, २०१०.

**वाचा :-** १) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक: अरजा-१४०९/प्र.क्र.८/०९/सेवा-६, दिनांक २४ ऑगस्ट, २००९.

२) महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१.

**शासन निर्णय** :-राज्य शासनाच्या महिला कर्मचा-यांसाठी प्रसूती रजेची मर्यादा १८० दिवसापर्यंत वाढविण्याबाबत वित्त विभागाने दि.२४ ऑगस्ट, २००९ च्या शासन निर्णयाद्वारे मान्यता दिलेली आहे. त्याच धर्तीवर राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक/ माध्यमिक/ उच्च माध्यमिक शाळामधील शिक्षिका व महिला शिक्षिकेतर कर्मचारी यांना प्रसूती रजा १८० दिवसापर्यंत खालील अटीस अधीन राहून मंजूर करण्यात यावी.

१) या सुविधेचा लाभ २ अपत्यापुरताच मर्यादित राहिल. प्रसूती रजा मंजूर करण्याच्या इतर शर्ती पूर्वीप्रमाणेच या पुढेही लागू राहतील.

२) या सुविधेचा लाभ दि २४/८/२००९ दिनांकापासून लागू राहिल.

३) महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी सेवेच्या शर्ती नियमावली १९८१ मधील नियम १६ मधील पोट-नियम १४ (अ) व (ब) तसेच पोट नियम १५, १६ व १७ यांचे कसोशीने पालन करणे अत्यावश्यक आहे.

४) महिला शिक्षण सेवकांना तसेच महिला शिक्षिकेतर कर्मचा-यांच्या बाबतीत त्यांचा शिक्षण सेवक कालावधी पूर्ण करीत असताना प्रसूती रजा घ्यावी लागल्यास शिक्षण सेवक पदाचा कालावधी त्या प्रमाणात वाढविणे आवश्यक आहे.

२. याबाबत शिक्षण संचालक, पुणे यांनी योग्य ते आदेश संबंधीतांना तात्काळ पारीत करावेत व महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी सेवेच्या शर्ती नियमावली १९८१ मध्ये योग्य ती सुधारणा करण्यासाठीचा प्रस्ताव शासनास तात्काळ सादर करावा.

Coordinator, IQAC
Smt. Rewaben Manoharbhai Patel
Mahila Kala Mahavidyalaya,
Bhandara

Officiating Principal
Smt. Rewaben Manoharbhai Patel,
Mahila Kala Mahavidyalaya
Bhandara

F:\nalini\GRM-2-cr-386-09.lwp

Scanned with Ca

सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१७८ / व्यय-५ .८ / ३ / २०१० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१००३०८१९३७११००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अ.मा.भट्टलवार)
सह सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रति,
शिक्षण संचालक, (माध्य.व उच्च माध्य./ प्राथमिक) महाराष्ट्र राज्य,पुणे.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)
सर्व शिक्षण निरीक्षक (उत्तर/दक्षिण/पश्चिम), मुंबई
सर्व लेखाधिकारी (शिक्षण विभाग)
महालेखापाल, १/२ (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१/२, मुंबई/ नागपूर
महालेखापाल, १/२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र -१/२, मुंबई/ नागपूर
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
मुंबई लेखापरिक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई
संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व जिल्हयाचे कोषागार अधिकारी
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई
लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद
वित्त विभाग / नगर विकास विभाग /ग्रामविकास व जल संधारण विभाग/ समाजकल्याण विभाग/अदिवासी विकास विभाग / उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शालेय शिक्षण विभागातील सर्व कार्यासने
संचालक, माहिती व जनसंपर्क यांना योग्य त्या प्रसिध्दीसाठी
निवड नस्ती माशि-२

Coordinator, IQAC
Smt. Rewaben Manoharbhai Patel
Mahila Kala Mahavidyalaya,
Bhandara

Officiating Principal
Smt. Rewaben Manoharbhai Patel
Mahila Kala Mahavidyalaya
Bhandara

Scanned with Ca

**रजा नियम**

महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१

शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना राज्य शासनाने राजपत्रातील अधिसुचनेद्वारा जाहीर केलेल्या सण व इतर सुट्ट्या वगळून प्रतीवर्ष महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ अन्वये खाते प्रमुखाकडे अर्ज देऊन, तो मान्य झाल्यावर खालील प्रमाणे रजा उपभोगता येते.

**सुट्टी:** अ) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१, प्रकरण २, नियम ९(२३) अन्वये परक्राम्य संलेख अधिनियम १८८१, कलम २५ अन्वये विहीत केलेली अथवा अधिसूचित केलेली सुट्टी.
ब) शासनाने राजपत्रातील अधिसूचनेद्वारा, शासकीय कार्यालय कामापुरते बंद ठेवण्याचा दिलेला आदेश.

**रजा:** महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याने कामावर अनुपस्थित राहण्यास दिलेली परवानगी.

- हक्क म्हणून रजा मागता येत नाही.
- रजा मंजूर करण्यास सक्षम अधिकाऱ्यास आवश्यकतेनुसार रजा नाकारण्याचा/रद्द करण्याचा अधिकार असतो.
- शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना सतत पाच वर्षाहून अधिक कालावधी करीता कोणतीही रजा मंजूर केली जाणार नाही.

| रजेचे नाव आणि नियम | किती दिवस | शेरा |
|---|---|---|
| नैमित्तिक (किरकोळ) रजा<br>(Casual Leave)<br>(अचानक, आपत्कालीन खाजगी कामासाठी रजा) | १ जानेवारी ते ३१ डिसेंबर या कॅलेंडर वर्षात ८ दिवस | एकाच वेळी सुट्टीचा दिवस धरुन सलग ७ दिवसांपेक्षा जास्त रजा देता येत नाही. |
| अर्जित रजा (पूर्ण पगारी)<br>(Earned Leave)<br>महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ चे नियम ५० अन्वये | ३०० दिवस<br>(एका वेळी सलग १८० दिवस) | प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या जानेवारी आणि जुलै महिन्याच्या पहिल्या दिवशी प्रत्येकी १५ दिवस या प्रमाणे वर्षात दोन हप्त्यात अर्जित रजा आगाऊ जमा होते.<br>एकूण कामाचे दिवस गुणीले १/११= येणारे दिवस.<br>(३०० दिवसापर्यंत रजा खात्यात जमा करुन ठेवता येते.) |
| अर्ध पगारी रजा<br>(Half pay Leave)<br>महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ चे नियम ६० अन्वये | सेवेच्या पूर्ण केलेल्या प्रत्येक वर्षासाठी २० दिवस | प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या जानेवारी आणि जुलै महिन्याच्या पहिल्या दिवशी प्रत्येकी १० दिवस या प्रमाणे वर्षात दोन हप्त्यात अर्जित रजा आगाऊ जमा होते. यात निलंबन काळ यात धरता |



Coordinator, IQAC
Smt. Rewaben Manoharbhai Patel
Mahila Kala Mahavidyalaya,
Bhandara

Officiating Principal
Smt Rewaben Manoharbhai Patel
Mahila Kala Mahavidyalay.
Bhandara

| | | |
|---|---|---|
| | | अशा महिला कर्मचाऱ्यास आपत्य नसावे तसेच तिने मुल दत्तक घेतलेले नसावे. |
| गर्भपात रजा<br>महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ चे नियम ७४(५) अन्वये | -- | सहा आठवड्यापेक्षा जास्त होणार नाही इतकी रजा. वैद्यकीय प्रमाणपत्र आवश्यक. |
| अपघाती/विशेष विकलांगता रजा<br>(Special Disability leave for Accidental Injury)<br>महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ चे नियम ७६ अन्वये | -- | ♦अपघाती रजा २४ महिन्यांपेक्षा अधिक नाही इतकी रजा मिळण्याचा हक्क असेल.<br>♦विशेष विकलांगता रजा १२० दिवसांपेक्षा अधिक नाही इतकी रजा मिळण्याचा हक्क असेल. |
| रुग्णालयीन रजा<br>(Hospital Leave)<br>महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ चे नियम ७७ अन्वये | -- | २८ महिन्यांपेक्षा अधिक नाही इतकी रजा मिळण्याचा हक्क असेल. |
| क्षय रोग/कर्क रोग/कुष्ठ रोग/पक्षघात रजा<br>(T.B./Cancer/Leprosy/ Paralysis Leave)<br>महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ चे नियम ७९ अन्वये | -- | १२ ते २४ महिन्यांपेक्षा अधिक नाही |
| अध्ययन रजा (Study Leave)<br>महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ चे नियम ८० अन्वये | -- | एका वेळी १२ महिने. संपूर्ण सेवा कालात २४ महिने. |
| विशेष नैमित्तिक रजा<br>(Special Casual Leave) | पिसाळलेला कुत्रा अथवा तत्सम जनावराने चावा घेतल्यास. | २१ दिवस विशेष नैमित्तिक रजा मिळू शकते. (वैद्यकीय दाखला आवश्यक) |
| विशेष नैमित्तिक रजा<br>(Special Casual Leave) | स्वत: नसबंदी शस्त्रक्रिया केल्यास | ६ दिवस विशेष नैमित्तिक रजा मिळू शकते. (वैद्यकीय दाखला आवश्यक) |
| विशेष नैमित्तिक रजा<br>(Special Casual Leave) | एकदा केलेली नसबंदी शस्त्रक्रिया अयशस्वी झाल्यामुळे दुसऱ्यांदा नसबंदी शस्त्रक्रिया केल्यास | ६ दिवस विशेष नैमित्तिक रजा मिळू शकते. (वैद्यकीय दाखला आवश्यक) |
| विशेष नैमित्तिक रजा<br>(Special Casual Leave) | कर्मचाऱ्याच्या पत्नीने बाळंतपणानंतर लगेचच संतती नियमनाची शस्त्रक्रिया केल्यास | कर्मचाऱ्यास ४ दिवस विशेष नैमित्तिक रजा मिळू शकते. (वैद्यकीय दाखला आवश्यक) |



Coordinator, IQAC
Smt. Rewaben Manoharbhai Patel
Mahila Kala Mahavidyalaya,
Bhandara

Officiating Principal
Smt. Rewaben Manoharbhai Patel
Mahila Kala Mahavidyalaya
Bhandara

Bhandara

| | | |
|---|---|---|
| | | येत नाही. |
| परिवर्तीत रजा (Commuted Leave) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ चे नियम ६१ अन्वये | देय असलेल्या अर्ध वेतनी रजेच्या निम्मे दिवस | देय अर्धपगारी रजा दुप्पट खर्ची टाकुन परिवर्तीत रजा मिळेल. कमाल ९० दिवस. (एकूण उपभोगलेली रजा ही अर्ध वेतनी रजेच्या दुप्पट दिवस खर्ची पडेल) |
| अनिर्जित रजा (Leave not due) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ चे नियम ६२ अन्वये | वैद्यकीय प्रमाणपत्र असल्यास, जेवढी अर्ध वेतनी रजा अर्जित होण्याची शक्यता असेल तितके दिवस | एकूण सेवेत कमाल ३६० दिवस. एका वेळेस ९० दिवस. संपूर्ण सेवा काळात कमाल १८० दिवस. |
| असाधारण रजा (Extraordinary Leave) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ चे नियम ६३ अन्वये | तीन वर्ष सतत सेवा पूर्ण - ६ महिने<br>पाच वर्ष सतत सेवा पूर्ण - १२ महिने<br>जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या प्रमाणपत्रावर मानसिक आजार, कर्क रोग ई. साठी - १८ महिने. | रजा खात्यावर कोणतीही रजा अनुज्ञेय नसेल तर किंवा विनंती वरुन. वैद्यकीय प्रमाणपत्र आवश्यक. |
| परिवीक्षाधीन कर्मचाऱ्यास रजा (Leave on Probation) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ चे नियम ६४ अन्वये | -- | अनुज्ञेय रजा मिळण्याचा हक्क असेल. |
| निवृत्तीपूर्व रजा (Leave to Preparatory to Retirement) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ चे नियम ६६ अन्वये | सलग १८० दिवस किंवा एकूण सेवा कालात २४ महिने. | नियत सेवा निवृत्तीच्या तारखे पलिकडे जाणार नाही ही दक्षता घेऊन कमाल १८० दिवस. कमाल २४ महिने. |
| प्रसूती रजा (Maternity Leave) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ चे नियम ७४ अन्वये | कायम सेवेत असणाऱ्या महिला कर्मचाऱ्यास, जर तीन किंवा तीन पेक्षा अधिक मुले हयात नसतील तर अर्जाच्या तारखे पासून १८० दिवस. | किमान सेवेची अट रद्द करण्यात आली आहे. दोन वर्षापेक्षा कमी सेवा झालेल्या महिला कर्मचाऱ्यास सहा महिन्याच्या वेतनाच्या रकमे इतका बॉड द्यावा लागेल.<br>♦अनाथ मुल दत्तक घेणाऱ्या महिला कर्मचाऱ्यास - ९० दिवस विशेष रजा अनुज्ञेय आहे.<br>♦सरोगसी पध्दतीने जन्मलेल्या आपत्त्याचे संगोपन करण्यासाठी महिला कर्मचाऱ्यास आपत्त्याच्या जन्म दिनांकापासून - १८० दिवस विशेष रजा सेवा कालात एकदाच अनुज्ञेय आहे. |



Coordinator, IQAC
Smt. Rewaben Manoharbhai Patel
Mahila Kala Mahavidyalaya,
Bhandara

Officiating Principal
Smt. Rewaben Manoharbhai Patel
Mahila Kala Mahavidyalaya
Bhandara

Scanned with Ca

| | | |
|---|---|---|
| विशेष नैमित्तिक रजा (Special Casual Leave) | कर्मचाऱ्याच्या पत्नीच्या बाळंतपणाव्यतिरिक्त अन्य वेळी संतती नियमनाची शस्त्रक्रिया केल्यास | कर्मचाऱ्यास ७ दिवस विशेष नैमित्तिक रजा मिळू शकते. (वैद्यकीय दाखला आवश्यक) |
| विशेष नैमित्तिक रजा (Special Casual Leave) | स्त्री कर्मचाऱ्याने बाळंतपणाव्यतिरिक्त अन्य वेळी संतती नियमनाची शस्त्रक्रिया केल्यास | स्त्री कर्मचाऱ्यास १४ दिवस विशेष नैमित्तिक रजा मिळू शकते. (वैद्यकीय दाखला आवश्यक) |
| विशेष नैमित्तिक रजा (Special Casual Leave) | कर्मचाऱ्याने स्वेच्छेने विनामूल्य रक्तदान केल्यास | कर्मचाऱ्यास १ दिवस विशेष नैमित्तिक रजा मिळू शकते. (वैद्यकीय दाखला आवश्यक) |
| विशेष नैमित्तिक रजा (Special Casual Leave) | राष्ट्रीय क्रिडा स्पर्धेत भाग घेण्यासाठी | कॅलेंडर वर्षात ३० दिवस विशेष नैमित्तिक रजा मिळू शकते. (क्रिडा अधिकाऱ्याचा दाखला आवश्यक) |
| विशेष नैमित्तिक रजा (Special Casual Leave) | कर्मचाऱ्याच्या पत्नीने बाळंतपणानंतर किंवा अन्य वेळी केलेली नसबंदी शस्त्रक्रिया अयशस्वी झाल्यामुळे दुसऱ्यांदा नसबंदी शस्त्रक्रिया केल्यास | कर्मचाऱ्यास ७ दिवस विशेष नैमित्तिक रजा मिळू शकते. (वैद्यकीय दाखला आवश्यक) |
| अध्ययन रजा महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ चे नियम ८० अन्वये | | पाच वर्षापेक्षा जास्त सेवा झालेल्या शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यासाठी लागू. लोकसेवेची निकड, कर्तव्यक्षेत्राशी संबंधीत उच्चशिक्षणासाठी एकावेळेस एक वर्ष, संपूर्ण सेवाकाळात दोन वर्षे. |

XXXXXXXXXXXXXXXXXXXXXXXXX

☛ किरकोळ रजा ही रजा समजली जात नाही. अर्जित वा अन्य प्रकारांच्या रजेला जोडून किरकोळ रजा घेता येणार नाही अथवा किरकोळ रजेला जोडून अर्जित वा अन्य प्रकारांच्या रजा घेता येणार नाहीत.

☛ रजा संपल्यानंतर स्वेच्छेने गैरहजर राहणारा शासकीय अधिकारी/कर्मचारी शिस्तभंग कारवाईस पात्र ठरेल. (नियम ४९)

☛ विपश्यनेसाठी रजा: शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना एकावेळी १४ दिवस परिवर्तित रजा घेता येते. अशी रजा तीन वर्षातून एकदा व संपूर्ण सेवा काळात सहा वेळा घेता येईल.

Officiating Principal
Smt. Rewaben Manoharbhai Patel
Mahila Kala Mahavidyalaya
Bhandara

डॉ. संजय कुंडेटकर, उपजिल्हाधिकारी.

Coordinator, IQAC
Smt. Rewaben Manoharbhai Patel
Mahila Kala Mahavidyalaya,
Bhandara